# संपादकीय





'सृजन' च्या त्रैमासिक अंकाची महानिर्मितीच्या बहुतांशी कर्मचाऱ्यांना आवर्जून प्रतिक्षा असते. याचे प्रमुख कारण म्हणजे या अंकातून अन्य प्रशासकीय वृत्ताबरोबरच कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांच्या अंगभूत कलागुणांना सातत्याने व्यासपीठ उपलब्ध झालेले आहे. 'सृजन'चा नवा अंकदेखील त्याच्या साडेतीन वर्षांच्या परंपरेला साजेसा करण्याचा प्रयत्न याही वेळेस केला आहे.

वीजनिर्मिती केंद्र असो वा वीजप्रकल्प या दोहोंच्या बाबतीत 'सुरक्षितता' हा सर्वांच्या दृष्टीने अंत्यंत महत्वपूर्ण विषय आहे. मग ती सुरक्षितता मानवी जिविताची असो किंवा तेथील संयंत्रांची. मार्चमध्ये जगभरात सुरक्षितता सप्ताह साजरा केला जातो व त्यानिमित्ताने या अंकात मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी व्यक्त केलेले मनोगत महत्वपूर्ण आहे. कर्मचारी - अधिकारी या सर्वांना विचारप्रवृत्त करायला लावणारे आहे.

महानिर्मितीच्या आजवरच्या प्रगतीत महत्वपूर्ण योगदान दिलेले संचालक (प्रकल्प) मा. श्री. व्ही.टी. बापट तसेच कार्यकारी संचालक (नि.प्र. १) मा. श्री. व्ही.जी. देशपांडे या दोन्ही कर्तबगार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सेवानिवृत्तीप्रीत्यर्थ या अंकात निरोपाचे मनोगत व्यक्त केले आहे. त्यांच्या मनोगतातून महानिर्मितीच्या प्रगतीसाठी त्यांची तळमळ प्रकर्षाने जाणवते. नुकतेच महानिर्मितीत कार्यकारी संचालक (मानव संसाधन) या पदावर रुजू झालेले मा. श्री. अरविंद चौधरी यांचेही मनोगत या अंकात आहे. भावी काळात महानिर्मितीला पुन:श्च यशोशिखरावर नेण्यासाठी सर्वांना प्रेरित करणारे हे मनोगत आहे.

अंकातील इतर साहित्यामध्ये प्रफुल्ल पाठक, गजानन महाजन, राजेंद्र भंडारी, प्रकाश प्रभावत, दिलीपराव पिंपरे यांचे लेख आपणास निश्चितच आवडतील. सर्वसमावेशक कविता विभाग, शिवाजी जवरे यांची वेधक हास्यचित्रे, कलावंत परिचय इतर स्फुट लेखन हेही उल्लेखनीय आहे. श्री. एल. एन. अंबेकर यांचा एम.ई.आर.सी. संबंधित अभ्यासपूर्ण लेख, 'आधी लग्न फिडरचे' हा इतरांना प्रेरणा देणारा लेख, श्री. एस.बी.भांदेकर यांचा कार्यशाळेविषयी अनुभवकथन करणारा लेख आपल्या पसंतीस उतरतील.नितीन गगे यांची आशयघन रेखाचित्रे याही अंकात आहेत.

आतील रंगीत पृष्ठांवर महानिर्मितीच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांत ज्या उत्साहाने सुरक्षितता सप्ताह संपन्न झाला त्यासंबंधीची छायाचित्रे अंतर्भूत आहेत.

अंकविषयक प्रतिक्रिया आवर्जून कळवाव्यात.

आपणा सर्वांना नवसंवत्सराच्या शुभेच्छा.

**महेश आफळे**
जनसंपर्क अधिकारी